# १८. लोककल्याणकारी स्वराज्याचे व्यवस्थापन

**सांगा पाहू !**

- शिवरायांनी कोणकोणत्या सत्तांशी संघर्ष केला ?

शिवरायांनी आदिलशाही, मुघल, पोर्तुगीज आणि जंजिरेकर सिद्दी या अन्यायकारी सत्तांशी दीर्घकाळ लढा दिला. त्यामुळे स्वतंत्र अशा हिंदवी स्वराज्याची निर्मिती झाली.

राज्यकारभाराचे काम व्यवस्थित चालावे म्हणून शिवरायांनी राज्यकारभाराची आठ खात्यांत विभागणी केली, हेच शिवरायांचे अष्टप्रधान मंडळ होय. प्रत्येक खात्याचा एक प्रमुख नेमला. त्यातूनच महाराजांचे अष्टप्रधान मंडळ साकार झाले. अष्टप्रधान मंडळाच्या माध्यमातून चालवलेले शिवरायांचे स्वराज्य हे खऱ्या अर्थाने लोककल्याणकारी राज्य होते. या अष्टप्रधानांच्या व इतरही महत्त्वाच्या अधिकाऱ्यांच्या नेमणुका, त्यांची पात्रता व गुणवत्ता पाहून महाराज स्वतः करत. त्यांच्या कारभारावर महाराजांची देखरेख असे.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

लोककल्याणकारी राज्यात प्रजेच्या अन्न, वस्त्र आणि निवारा या जीवनावश्यक गरजा पूर्ण होतात. स्त्रियांचा सन्मान केला जातो. सामान्य जनतेची, शेतकऱ्यांची फसवणूक होत नाही. कोणावरही अन्याय होत नाही. प्रजेला जलद न्याय मिळतो. शेती आणि उद्योगांचा विकास होतो. लोककला बहरू लागतात. प्रजा सुखा-समाधानाने राहते.

शिवछत्रपतींनी निर्माण केलेल्या स्वराज्यात त्यांची प्रजा सुखासमाधानाने राहू लागली. त्यामुळे महाराष्ट्रातील लोकांच्या ठिकाणी प्रखर आत्मविश्वास, स्वाभिमान आणि देशप्रेम दिसू लागले.

**अष्टप्रधान मंडळ**

| | प्रधानाचे नाव | पद | काम |
|---|---|---|---|
| १. | मोरो त्रिंबक पिंगळे | प्रधान | राज्यकारभार चालवणे. |
| २. | रामचंद्र नीळकंठ मुजुमदार | अमात्य | राज्याचा जमाखर्च पाहणे. |
| ३. | हंबीरराव मोहिते | सेनापती | सैन्याचे नेतृत्व करणे. |
| ४. | मोरेश्वर पंडितराव | पंडितराव | धर्माची कामे पाहणे. |
| ५. | निराजी रावजी | न्यायाधीश | न्यायदान करणे. |
| ६. | अण्णाजी दत्तो | सचिव | सरकारी आज्ञापत्रे पाठवणे. |
| ७. | दत्ताजी त्रिंबक वाकनीस | मंत्री | पत्रव्यवहार सांभाळणे. |
| ८. | रामचंद्र त्रिंबक डबीर | सुमंत | परराज्यांशी संबंध ठेवणे. |



शिवराय शेतकऱ्यांना बैलजोड्या व इतर जीवनावश्यक साहित्य देताना

करून पहा.


- पाठ्यपुस्तकातील 'आज्ञापत्रातील पर्यावरण रक्षण' हा भाग मोठ्या अक्षरांत लिहून त्याचा तक्ता तयार करा, त्याचे वर्गात सामूहिक वाचन करा.

## पर्यावरणाचे संरक्षण

त्या त्या प्रदेशांवर निसर्गाने निर्माण केलेली भूमी, हवा, पाऊस, नद्या, समुद्र, ओढे, जंगले, लहान-मोठे प्राणी, पक्षी, सूर्यप्रकाश, चंद्रप्रकाश इत्यादी सर्व घटकांमधूनच मानवाच्या आजूबाजूस जो परिसर तयार होतो, त्यालाच 'नैसर्गिक पर्यावरण' असे म्हटले जाते. या पर्यावरणाचा आवश्यक त्या प्रमाणात उपयोग करून घेणे मानवाच्या हिताचे असते.

पर्यावरणातील या विविध घटकांचा नाश होणार नाही, याची शिवरायांनी दक्षता घेतलेली दिसून येते.

आपल्या राज्यातील जंगले लोकांकडून नष्ट होणार नाहीत, याकडे शिवरायांनी अधिक लक्ष दिले. उदा. आरमारासाठी लहान-मोठ्या नावा, जहाजे, वल्हे, सोट इत्यादी तयार करावे लागतात. त्यासाठी लाकूड लागते. म्हणून फक्त सागवानाचीच झाडे तोडावीत. अधिक सागवान पाहिजे असेल तर ते परक्या मुलखातून खरेदी करावे, परंतु कोणत्याही परिस्थितीत आंबे, फणस इत्यादी झाडे तोडू नयेत. असली झाडे वर्षा दोन वर्षांत तयार होत नाहीत. प्रजेने ही झाडे आपल्या मुलांसारखी जतन करून वाढवलेली असतात. ती तोडून प्रजेला दुःख देऊ नये. अगदीच एखादे झाड जीर्ण असेल, तर त्या झाडाच्या मालकाला रोख पैसे देऊन त्याचे



**पर्यावरणाचे संरक्षण**

समाधान करून मगच ते तोडावे. अशा प्रकारचे अनेक हुकूम शिवरायांनी दिले होते, असे आज्ञापत्रावरून समजून येते.

**हे नेहमी लक्षात ठेवा.**

पर्यावरण रक्षणाचे महत्त्व पटवून देण्यासाठी आणि पर्यावरणाचा ऱ्हास रोखण्यासाठी ५ जून हा दिवस दरवर्षी 'जागतिक पर्यावरण दिन' म्हणून साजरा केला जातो.

## जल व्यवस्थापन

शिवरायांनी स्वराज्यातील गावोगावी छोटे-मोठे बंधारे बांधून लोकांना पिण्यासाठी पाणी उपलब्ध करून दिले. तसेच या बंधाऱ्यांना पाट काढून शेतीसाठीही पाणी उपलब्ध करून दिले. त्यामुळे स्वराज्याचे उत्पन्न वाढले. स्वराज्यातील रयतेला दुष्काळाची कधीही तीव्रता जाणवली नाही. शिवरायांच्या काळात गडांवर वस्ती करून राहणाऱ्या प्रजेची संख्या मोठी असे. तेथे पाण्याची व्यवस्था करण्यासंबंधी शिवराय काळजी घेत असत. गड बांधण्यापूर्वी त्या जागेवर पुरेसे पाणी आहे का याची पाहणी केली जात असे. अशा एखाद्या जागी पाणी नसेल, तर तेथे पावसाळ्यापूर्वीच तळी आणि टाक्या बांधून पावसाचे पाणी त्यांमध्ये साठवले जाई.

हे साठवलेले पाणी जपून वापरले जात असे. अशा जलव्यवस्थेमुळे गडांवरील लोकांना आणि स्वराज्यातील प्रजेला दुष्काळातही पाण्याची टंचाई जाणवत नसे.



शिवरायांनी पाटबंधारे बांधून शेती व पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली

**सांगा पाहू !**

- पाण्याचा वापर काटकसरीने का करावा ?
- तुमच्या गावात/परिसरात कोणते धरण, तळे आहे ?
- जल व्यवस्थापन म्हणजे काय ?
- जल व्यवस्थापनाबाबत शासनाच्या कोणत्या योजना आहेत ?

**माहीत आहे का तुम्हांला ?**

- राज्याला कायमस्वरूपी दुष्काळापासून मुक्त करण्यासाठी शासनाने ‘जलयुक्त शिवार’ ही योजना सुरू केली आहे.

## दुष्काळ निवारण

दुष्काळग्रस्त काळात शिवराय शेतकऱ्यांना विविध सवलती देत असत. प्रजेला सारा माफ करत असत. त्यामुळे स्वराज्यातील दुष्काळाची दाहकता कमी होत असे. एखाद्या वर्षी स्वराज्यात दुष्काळ पडल्यास शिवराय सरकारी कोठारात साठवलेले धान्य रयतेला मोफत वाटून देत असत. तसेच दुष्काळाच्या वर्षी शिवराय वेगवेगळ्या किल्ल्यांवर दुरूस्तीची कामे सुरू करत. त्याचप्रमाणे धरणे, कालवे, बंधारे यांचीही कामे सुरू करत. या कामांमुळे शेतकऱ्यांबरोबरच कारागिरांना म्हणजेच बलुतेदारांना रोजगार मिळत असे. रोजगार मिळाल्यामुळे स्वराज्यातील रयतेला दुष्काळाची तीव्रता कधीच जाणवली नाही.

शेतकरी समृद्ध झाल्यामुळे काल ज्याच्या पायात जोडा नव्हता, त्याने जोडा घेतला. अंगावर वस्त्र नव्हते, त्याने वस्त्र घेतले. त्यामुळे विणकरांना काम मिळाले. राहायला ज्यांना घर नव्हते, त्यांची

घर बांधण्याची परिस्थिती निर्माण झाली. त्यामुळे घर बांधणाऱ्या गवड्यांना, सुतारांना, लोहारांना व वीट बनवणाऱ्या कुंभारांना काम मिळाले. अशा प्रकारे स्वराज्यात शेतकऱ्यांबरोबर कारागीर व बलुतेदार सुखी व समृद्‌ध झाले.



**सांगा पाहू !**

- तुमच्या गावातील/परिसरातील बाजारपेठेचे नाव सांगा.
- बाजारपेठेला ते नाव का पडले असेल, त्याची माहिती सांगा .

## सागरी व्यापार आणि इतर व्यापारपेठा

स्वराज्याचे संरक्षण चांगल्या प्रकारे करता यावे म्हणून स्वराज्याला लागून असणाऱ्या समुद्रावर आपली हुकमत असली पाहिजे, या हेतूने शिवरायांनी आपले स्वतंत्र आरमार उभे केले. तितकेच करून ते थांबले नाहीत, तर स्वराज्यातील व्यापार वाढावा म्हणून त्यांनी मालाची वाहतूक करणारी खास जहाजे बांधून घेतली. राजापूरसारखी व्यापारी बंदरे विकसित केली. त्याचप्रमाणे रायगडावर खास बाजारपेठ वसवली. पुण्याशेजारी खेड शिवापूर ही वेगळी व्यापारी पेठ सुरू केली. मोठ्या गावात आणि रस्त्यावरील गावात व्यापार पेठा निर्माण केल्या. वीरमाता जिजाबाईंच्या हुकुमाप्रमाणे पुण्याजवळील पाषाण गावात एक नवीन पेठ तयार करण्यात आली होती. तिचा उल्लेख 'जिजापूर' म्हणून केला जात असे.

स्वराज्यातील व्यापार वाढावा म्हणून शिवरायांनी बाहेरील प्रदेशांतून येणाऱ्या वस्तूंवर जास्त कर बसवला. पोर्तुगीज हद्‌दीत येणाऱ्या मिठावर त्यांनी अधिक कर बसवला. त्यामुळे त्या मिठाची किंमत वाढली. याउलट, स्वराज्यात तयार होणाऱ्या मिठावरील कर त्यांनी कमी केले. त्यामुळे लोकांना स्वराज्यातील मीठ स्वस्त मिळू लागले. अर्थातच स्वराज्यातील मिठाचा व्यापार वाढला. त्यामुळे स्थानिक व्यापाराला चालना मिळाली.

स्वराज्यातील व्यापार-उद्योगांची वाढ होण्यासाठी शिवराय प्रयत्न करत होते. आपल्या प्रजेची व्यापाऱ्यांकडून कोणत्याही प्रकारची फसवणूक होता कामा नये, याकडे ते जातीने लक्ष, देत. कोकणामध्ये नारळ, सुपारीच्या व्यापारांत लोकांची फसवणूक होत आहे हे समजल्यावर शिवरायांनी तेथील सुभेदाराला ताकीद दिली होती.

## स्त्रियांचा सन्मान

युद्‌धाच्या काळात शत्रूपक्षाच्या स्त्रिया किंवा मुले यांना कोणत्याही प्रकारची इजा करता कामा नये, उलट त्यांना अतिशय मानाने वागणूक देण्याचे हुकूम महाराजांनी दिले होते. त्यांनी स्वत: अनेकदा आपल्या वर्तनातून स्त्रियांना मानाने कसे वागवावे याचे आदर्श घालून दिलेले आढळतात.

कर्नाटकातील बेलवडी येथील गढी जिंकण्यासाठी मराठी सैन्य गेले होते. तेथील गढीच्या रक्षणासाठी मल्लम्मा देसाई या शूर महिलेने मोठा संघर्ष केला. तिच्या पराक्रमाची बातमी शिवरायांना समजली. तेव्हा त्यांनी मल्लम्माला आपली धाकटी बहीण मानून तिची गढी व गावे सन्मानपूर्वक तिला परत केली, तसेच तिला 'सावित्री' हा किताब दिला.

## स्वच्छतेविषयी दक्षता

घरे आणि सार्वजनिक ठिकाणे अधिकाधिक स्वच्छ कशी ठेवता येतील, यासंबंधीही



**बेलवडीच्या मल्लम्मा देसाईचा सन्मान करताना शिवराय**

शिवरायांच्या काळात उपाययोजना केली असल्याचे समजून येते. घराभोवती निरगुडीच्या झाडाचे कुंपण घालून घरामध्ये उंदीर, विंचू, किडा, मुंगी यांसारखे प्राणी येणार नाहीत याची दक्षता घ्यावी. त्याचप्रमाणे धूर करून आरोग्याला धोकादायक असणारे जंतू नष्ट करावेत, अशाही आज्ञा शिवरायांनी दिलेल्या पहायला मिळतात.

गडावरील बाजारपेठेत, रस्त्यांवर केरकचरा राहणार नाही, याची ताकीद देण्यात आलेली दिसते. इतकेही करून जर जागोजाग कचरा पडला असेल, तर तो गडाखाली फेकू नये. तो कचरा त्याच जागेवर जाळून टाकावा आणि त्यापासून होणारी राख परड्यातील भाजीपाल्यासाठी खत म्हणून वापरावी, अशा विविध सूचना केलेल्या आढळतात.

शिवरायांनी गडांची उभारणी, तोफा-दारूगोळा, आरमार, पर्यावरणाचे संरक्षण, जल व्यवस्थापन, सागरी व्यापार आणि व्यापार पेठा, स्वच्छतेविषयी दक्षता यासंबंधी जे व्यवस्थापन केले होते ते आजही मार्गदर्शक ठरणारे आहे.

## हिंदवी स्वराज्य

हिंदवी स्वराज्य हे शिवरायांचे स्वप्न होते. हिंदवी म्हणजे हिंदुस्थानात राहणारे; मग ते कोणत्याही धर्माचे असोत, कोणत्याही जातीचे असोत. त्यांचे राज्य ते हिंदवी स्वराज्य.

## उदार धार्मिक धोरण

शिवरायांचे धार्मिक धोरण उदार होते. मोहिमेवर असताना शिवरायांनी मशिदींना उपद्रव दिला नाही. कुरआन शरीफची एखादी प्रत हाती आल्यास ते ती प्रत सन्मानपूर्वक मुसलमानांकडे सोपवून देत. कोणी मुसलमान म्हणून ते त्याचा

द्‌वेष करत नसत. कोणी धर्म बदलला, पण पुन्हा त्याला स्वत:च्या धर्मात परत यावे असे वाटले, तर ते त्याला दूर लोटत नसत. बजाजी नाईक निंबाळकर हा शिवरायांचा मेहुणा होता. तो विजापूरच्या आदिलशहाच्या चाकरीत होता. आदिलशहाने त्याला स्वत:च्या धर्मात घेतले. बजाजी विजापुरात राहू लागला. त्याला काही कमी नव्हते, पण आपला धर्म बदलला याबद्‌दल त्याचे मन त्याला खाई. त्याला वाईट वाटे. त्यामुळे त्याने स्वधर्मात परत यायचे ठरवले, तेव्हा शिवरायांनी त्याला स्वधर्मात घेतले. नेतोजी पालकर याची हकीकतही अशीच आहे. नेतोजी पालकर याचा धर्म बदलला, पण नंतर त्याला स्वधर्मात येण्याची इच्छा झाली, तेव्हा शिवरायांनी त्यालाही स्वधर्मात घेतले.

**माहीत आहे का तुम्हांला ?**

- शिवराय साधु-सज्जनांना फार मान देत. त्यांना मंदिरे प्रिय होती. त्यांनी मशिदींचेही रक्षण केले. त्यांना भगवद्‌गीता पूज्य होती. त्यांनी कुरआन शरीफचाही मान राखला. ख्रिस्ती लोकांच्या प्रार्थनामंदिरांनाही ते जपत. शिवराय विद्‌वानांचा आदर करत. परमानंद, गागाभट्ट, धुंडीराज, भूषण इत्यादी विद्‌वानांचा त्यांनी सत्कार केला. तसेच संत तुकाराम, समर्थ रामदास, बाबा याकूत, मौनीबाबा यांचाही त्यांनी बहुमान केला.



शिवरायांचे आठवावे रूप

**शिवरायांचे आठवावे रूप :** काळ्याकुट्ट अंधारात आपली दिशा ठरवून वाट काढायची, संकटे आली असता डगमगून न जाता त्यांवर मात करून पुढे जायचे, बलाढ्य शत्रूंशी आपल्या तुटपुंज्या बळाने झुंज देत आपले सामर्थ्य वाढवत जायचे, सहकाऱ्यांना उत्साह देत व शत्रूंना सतत चुकवत यश मिळवायचे – हे सर्व गुण शिवरायांमध्ये होते. आदर्श पुत्र, सावध नेता, कुशल संघटक, लोककल्याणकारी प्रशासक, हिकमती लढवय्या, दुर्जनांचा कर्दनकाळ, सज्जनांचा कैवारी आणि एका नव्या युगाचा निर्माता, असे शिवरायांच्या व्यक्तिमत्त्वाचे कितीतरी तेजस्वी पैलू आहेत. हे सारे पाहिले, की पुन्हापुन्हा वाटते–

'शिवरायांचे आठवावे रूप ।
शिवरायांचा आठवावा प्रताप ।
शिवरायांचा आठवावा साक्षेप भूमंडळी ।।'

## स्वाध्याय

**१. सांगा पाहू !**

(अ) स्वतंत्र अशा हिंदवी स्वराज्याची निर्मिती झाली.

(आ) स्वराज्यातील रयतेला दुष्काळाची कधीही तीव्रता जाणवली नाही.

(इ) शिवरायांनी मल्लम्मा देसाई हिला दिलेला किताब.

**२. रिकाम्या जागी योग्य शब्द लिहा व तक्ता पूर्ण करा.**

**३. चर्चा करा.**

पर्यावरणातील विविध घटकांचा नाश होणार नाही याची दक्षता शिवरायांनी कशाप्रकारे घेतलेली दिसून येते. तुम्ही पर्यावरण रक्षणासाठी काय काय करू शकाल ?

**४. वाचा व तुमच्या शब्दांत माहिती सांगा.**

'जल व्यवस्थापन' या विषयीची माहिती वाचा व या विषयावर तुमच्या शब्दांत माहिती सांगा.

| | प्रधानाचे नाव | पद | काम |
|---|---|---|---|
| १. | मोरो त्रिंबक पिंगळे | ------ | राज्यकारभार चालवणे. |
| २. | ------------ | अमात्य | राज्याचा जमाखर्च पाहणे. |
| ३. | हंबीरराव मोहिते | सेनापती | ------------ |
| ४. | मोरेश्वर पंडितराव | ------ | धर्माची कामे पाहणे. |
| ५. | ------------ | न्यायाधीश | ------------ |
| ६. | अण्णाजी दत्तो | ------ | ------------ |
| ७. | ------------ | ------ | पत्रव्यवहार सांभाळणे. |
| ८. | रामचंद्र त्रिंबक डबीर | सुमंत | ------------ |

**उपक्रम**

(अ) तुमच्या वर्गातर्फे शाळेच्या आवारात बाजार भरवा. विविध वस्तू व त्यांच्या किंमतींची यादी तयार करा. त्यासाठी परिसरातील बाजारपेठेस भेट द्या.

(आ) तुमच्या शाळेच्या परिसरात तुम्ही कोणती झाडे लावली आहेत, त्यांचे जतन तुम्ही कसे करता ते सांगा.


0CEKSV

# ‘आज्ञापत्रातील’ पर्यावरण रक्षण


रामचंद्रपंत अमात्यांनी ‘आज्ञापत्र’ लिहिले. यात शिवाजी महाराजांच्या धोरणांचे प्रतिबिंब आढळते. खालील उताऱ्यातून महाराजांचा पर्यावरणासंबंधीचा दृष्टिकोन स्पष्ट होतो.

‘‘आरमारास तख्ते, सोट, डोलाच्याकाठ्या आदिकरून थोर लाकूड असावे लागते आपले राज्यात अरण्यात सागवानादि वृक्ष आहेत, त्यांचे जे अनुकूल पडेल ते हुजूर लेहून हुजूरचे परवानगीने तोडून न्यावे. याविरहित जे लागेल ते परमुलकीहून खरेदी करून आणवीत जावे. स्वराज्यातील आंबे, फणस आदिकरून हेही लाकडे आरमारचे प्रयोजनाची, परंतु त्यांस हात लाऊ न द्यावा. काये म्हणोन की, ही झाडे वर्षा दोन वर्षांनी होतात यैसे नाही. रयतेने ही झाडे लाऊन लेकरांसारखी बहुत काल जतन करून वाढविली. ती झाडे तोडिल्यावरी त्याचे दुःखास पारावार काये? एकास दुःख देऊन जे कार्य करीन म्हणेल ते कार्य करणारासहित स्वल्पकालेच बुडोन नाहीसेच होते; किंबहुना धन्याचेच पदरी प्रजापीडणाचा दोष पडतो. या वृक्षांच्या अभावे हानीही होते. याकरिता हे गोष्ट सर्वथा होऊ न द्यावी. कदाचित एखादे झाड जे बहुत जीर्ण होऊन कामातून गेले असेल तरी त्याचे धन्यास राजी करून द्रव्य देऊन त्याच्या संतोषे तोडून न्यावे...’’




जिंजीचा किल्ला सध्याच्या तमिळनाडू राज्यात आहे. छत्रपती शिवाजी महाराजांनी दक्षिण दिग्विजयाच्या मोहिमेवर असताना तो जिंकून घेतला. हा किल्ला मूळचाच दुर्गम होता. तरी देखील महाराजांनी त्याचे आधीचे तट पाडले आणि नवे तट व बुरूज बांधून तो अधिक मजबूत बनवला. किल्ले दुर्गम कसे बनवावेत, याचे शिक्षण शहाजीराजांनी त्यांना लहानपणीच दिले होते. शिवाजी महाराजांनी त्या ज्ञानाचा उपयोग या प्रसंगी केला, असे दिसते. पुढे राजाराम महाराजांनी या किल्ल्यावर आपली राजधानी स्थापन केली. ते त्या किल्ल्यावर असताना मुघलांनी त्याला वेढा दिला. परंतु राजाराम महाराजांनी त्या वेढ्यात अडकूनही सुमारे सात वर्षेपर्यंत किल्ला लढवला. शिवाजी महाराजांनी दूरदृष्टी ठेवून हा किल्ला अधिक मजबूत केलेला असल्यामुळेच राजाराम महाराज इतका काळ या किल्ल्यावर सुरक्षित राहू शकले.



भवानीदेवी–प्रतापगड


किशोर
कथा, कविता, कादंबरीका, एकांकिका,
दीर्घकथा, गंमतगाणी, ललित, छंद, चरित्र,
विज्ञान, देश-देशांतर, लोककथा
लोकप्रिय व अभिरुचिसंपन्न किशोर
मासिकातील चाळीस वर्षांतील
निवडक साहित्यांवर आधारित
'निवडक किशोर'चे १४ खंड
किंमत प्रत्येकी
₹१६३/-
(30% सूट)
वरील खंड पाठ्यपुस्तक मंडळाच्या सर्व भांडारांत विक्रीसाठी
उपलब्ध आहेत. १४ खंडांची एकूम किंमत ₹ १६००/-
किशोर
वरील खंडांच्या खरेदीसाठी मंडळाच्या पुढील विभागीय भांडारांशी संपर्क साधा.
पुणे (०२०- २५६५९४६५), मुंबई (गोरेगाव) (०२२-२८७७१८४२), औरंगाबाद (०२४०- २३३२१७१),
नागपूर (०७१२-२५२३०७८/ २५४७७१६), नाशिक (०२५३- २३९१५११), लातूर (०२३८२- २२०९३०),
कोल्हापूर (०२३०- २४६८५७६), अमरावती (०७२१-२५३०९६५), पनवेल (०२२- २७४६२६४५)



शत्रूची ठाणी उठवून आपली ठाणी बसवावी, म्हणून शिवाजीमहाराजांचे परगणा मुरगूडचे (जि. कोल्हापूर) देसाई रुद्राप्पा नाईक यांना दिनांक ११ डिसेंबर १६७६ रोजी पाठवलेले पत्र. हे पत्र मोडी लिपीत आहे.

**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे.**

परिसर अभ्यास भाग – २ इ. ४ थी (मराठी माध्यम)

**₹ ३६.००**